नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 30/03/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावर मौजा घोराड येथे दिनांक 29/03/2021 चे 16.30 वा. ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा नामे– सुमित धनराज बागडे(मृतक), वय 30 वर्ष, रा. घोराड हा धुलीवंदन असल्याने बाहेर गेला होता. तो घरी दारूच्या नशेत परत येवुन आला व आपले बेडरूमध्ये गेला. त्याने जेवन केले नसल्याने फिर्यादी यांनी त्यास जेवण करण्याकरीता आवाज दिला होता. त्याने कोणताही प्रतिसाद न दिल्याने फिर्यादीने दरवाजाची कडी काढून आतमध्ये जावून पाहीले असता मृतक याने साडीने पंख्याला गळफास घेतलेल्या मृत अवस्थेत तो आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धनराज किसन बागडे वय 58 वर्ष, रा. घोराड वार्ड नं 3 यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ वानखेडे 9850492065 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 3 कि. मी. मौजा मानापुर येथे दिनांक 29/03/2021 चे 14.00 वा. दरम्यान मृतक नामे– मंगेश आसाराम समरीत, वय 23 वर्ष, रा. मानापुर हा आपल्या वडीलांना म्हणाला की, ''बाबा एवढी दारू प्यायला का लागले'' तेव्हा मृतकाचा वडीलांनी मृतकास म्हटले की, ''तु मला शिकवतो काय?'' याकारणावरून मृतक हा रागाच्या भरात विहीरीत कुदला व त्यास बाहेर काढले व सरकारी दवाख्यान्यात नेले असता डॉक्टरांनी तपासुन त्यास मृतक घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विष्णु गोपाळा समरीत, वय 63 वर्ष, रा. मानापुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा राउत 9423628307 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर